http://www.swaroopyog.net

स्वामी माधवानंद (डॉ. माधव नगरकर) ह्यांचे ह्युस्टनचे कार्यक्रम

रामनवमीनिमित्त गीत-भावतरंग

रामगीतांचे सुश्राव्य गायन, आणि त्यावर **श्रीरामरक्षा** भावार्थ आणि रामकथेतील सुंदर पण अपरिचित प्रसंगांवर विवरण करीत आहेत - **स्वामी माधवानंद**.

पदगायक: श्रेयस बेडेकर, अश्विन रोडे, अतुल व तेजश्री दीक्षित.
साथीला: श्री. निषाद कान्हेरे (तबला), श्रेयस बेडेकर (हार्मोनियम), श्री. आशुतोष पटवर्धन (मंजिरा).

कधी : **शनिवार, मार्च २९, २०१४** **वेळ** : संध्याकाळी ४:०० ते ६:०० वाजेपर्यंत. **प्रवेश:** विनामूल्य
स्थळ : Vedanta Society of Greater Houston, 14809 Lindita Drive, Houston, TX 77083
(near Beechnut@Highway 6, http://houstonvedanta.org)

संपर्क: अनिल रोडे anil.g.rode@gmail.com (281-795-8934)
शोभा कुलकर्णी shobha_kulkarni@yahoo.com (281-575-0094)

श्रीब्रह्मचैतन्यांचा अमृतयोग

पूज्य गोंदवलेकर महाराजांचे व्यक्तिमत्व आणि वाङ्मयसौंदर्य

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज व त्यांची प्रवचने सर्वांना सुपरिचित आहेतच. ह्या निरूपणात त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वातील आणि वाङ्मयातील रस आणि बोध सूक्ष्म दृष्टीने उकलून आपणास सादर करीत आहेत - **स्वामी माधवानंद**.

अभंगगायन: श्रुती सांपळे, आणि इतर गायक व साथीदार.

कधी : **रविवार, मार्च ३०, २०१४** **वेळ** : संध्याकाळी ३:३० ते ५:३० वाजेपर्यंत. **प्रवेश:** विनामूल्य
स्थळ : Harris County - MUD #81, 805 Hidden Canyon Rd, Katy, Texas 77450

संपर्क: शोभा कुलकर्णी (281-575-0094) shobha_kulkarni@yahoo.com
विजया हाटे (281-392-6170) ruheehate@gmail.com
नीलिमा मांडके (281-395-4591) nmandke@gmail.com

कार्यक्रमाच्या ठिकाणी उपलब्ध नवीन प्रकाशने:

स्वामी माधवानंद लिखित नवे अर्थ विवरण करणारे सुंदर ग्रंथ,

1. श्रीगजाननविजय भक्तिरसास्वाद - गजाननविजय ग्रंथातील प्रसंगांतून श्रीमहाराजांचे अभिनव दर्शन आणि भावार्थविवरण
2. श्रीगणपती अथर्वशीर्ष भावार्थसार व श्रीरामरक्षा भावार्थसार - स्तोत्रांमधील मंत्रांचे आणि पदांचे अर्थ, आणि सुंदर कथांसह सूक्ष्म विवरण
3. अमूर्तपूजेची फुले - स्वरूपबोधाची साधना सूत्ररूपाने व्यक्त करणारा सुमनमाला ग्रंथ
4. सरस रामायण - रामकथेतील शब्दांमागच्या सूक्ष्म अर्थछटा व मनोहर भावछटा उकलून दाखविणारा ग्रंथ

हे व इतर ग्रंथ कार्यक्रम स्थळी उपलब्ध असतील.

तसेच,

1. स्वामी विवेकानंद आणि त्यांचे गुरु रामकृष्ण - ६८ भागातील (एकूण २२ तासांचे) विवरण CD set
2. असामान्य लोकमान्य - लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित MP3 audio CD
3. नवविधा भक्ती - दासबोधातील नऊ भक्तींवरील विवरण MP3

इत्यादि CDs कार्यक्रम स्थळी उपलब्ध असतील.

स्वामी माधवानंद



भगवद्गीता व ज्ञानेश्वरी यांमधील श्लोकांचे व ओव्यांचे सूक्ष्म विवरण करून त्यांतील अलौकिक असे दृष्टांत त्यांच्या अध्यात्माच्या उंचीसह साधकांना उलगडून दाखवणे हे स्वामी माधवानंदांचे खास वैशिष्ट्य आहे. गीता ज्ञानेश्वरीप्रमाणे दासबोध, योगसूत्रे व ध्यानयोग यांवर होणारी स्वामी माधवानंदांची नित्य प्रवचने हा साधकांसाठी एक आनंदमय अनुभव असतो. शास्त्रीय संशोधन क्षेत्रात दोन तपे संशोधन कार्य केल्यामुळे लाभलेल्या शास्त्रीय दृष्टिकोनामुळे त्यांचे विवेचन आधुनिक पिढीला रुचणारे असते.

गीता - ज्ञानेश्वरीवर गेली अठरा वर्षे झालेल्या प्रवचनांमधून निर्माण झालेले सुंदर वाङ्मय ग्रंथरूपाने सर्व साधकांना उपलब्ध व्हावे या हेतूने 'गीता ज्ञान' ग्रंथमालिका निर्माण करण्याचा संकल्प स्वरूपयोग प्रतिष्ठान या संस्थेने केला आहे. 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' या सदर ग्रंथात 'महाभारताच्या पार्श्वभूमीवर गीता' ह्या विशेष भूमिकेतून त्यातील व्यक्तिरेखांच्या वैशिष्ट्यांबरोबरच ठिकठिकाणी ज्ञानेश्वरीतील सौंदर्याचे दर्शन घडविले आहे.या ग्रंथमालिकेतील हा प्रथम ग्रंथ सर्वांना आल्हाददायक वाटेल यात शंका नाही.

कार्य-

- आदिनाथांपासून ज्ञानेश्वर महाराज व पुढे स्वामी स्वरूपानंद व स्वामी माधवनाथ यांपर्यंत चालत आलेल्या नाथ संप्रदायाच्या ध्यानयोगप्रधान शाखेचे उत्तराधिकारी.
- गीता - ज्ञानेश्वरी व दासबोध या ग्रंथांवर अभ्यासपूर्ण व प्रासादिक निरूपणे.
- ध्यानयोग (Science of Meditation) या विषयावर विवेचने व मार्गदर्शन.
- संतकाव्यातील भावसौंदर्य विवरण.
- देशात व परदेशात (अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया) अध्यात्म व योग प्रचार.
- विविध शहरात उपासना केंद्रे उभारून स्वाध्याय व साधना यांसाठी साधकांना मार्गदर्शन.

युवकांमध्ये कार्य-

- युवा केंद्रे व किशोर केंद्रे चालविणे
- युवा शिबिरे (निवासी)
- युवकांना गीता - ज्ञानेश्वरी - दासबोध -स्वाध्याय, वक्तृत्व, ध्यानयोग यांसाठी मार्गदर्शन